# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक – 17.03.2024** **वार–रविवार**

---

**मतदान**

पुणे जिल्ह्यात पुण्यासह मावळ, शिरुर आणि बारामती या 4 लोकसभा मतदारसंघांचा समावेश असून एकंदर 82 लाख 24 हजार 423 पात्र मतदार असल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. यामध्ये 42 लाख पुरुष, 39 लाख महिला आणि 719 तृतीयपंथी मतदारांचा समावेश आहे. 35 हजार 232 मतदार यंदा प्रथमच मतदान करणार आहेत; तर 13 लाख 42 हजार मतदार 20 29 या वयोगटातील आहेत. जिल्ह्यात एकंदर 8 हजार 352 मतदान केंद्र तयार करण्यात आली आहेत. 1 लाख 24 हजार 289 मतदार ८५हून अधिक वयोगटातील असून त्यांच्यासाठी गरजेनुसार घरातून मतदान करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. शिरूर मतदारसंघात सर्वाधिक म्हणजे 25 लाख 461 मतदार असून पुणे मतदारसंघात सर्वात कमी म्हणजे 20 लाख 3 हजार 316 मतदार आहेत. बारामतीमध्ये 23 लाख 15 हजार 68 तर मावळमध्ये 24 लाख 79 हजार 742 मतदार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. जिल्ह्यातील पुणे, शिरूर आणि मावळ मतदारसंघात 13 मे रोजी तर बारामतीमध्ये 7 मे रोजी मतदान होणार आहे. निवडणूक प्रक्रियेसाठी जिल्हा प्रशासन सज्ज असल्याचं दिवसे यांनी सांगितलं. जिल्ह्यात निवडणुकीसाठी एकंदर 78 हजाराहून अधिक अधिकारी आणि कर्मचारीवर्ग नियुक्त करण्यात आला आहे. 44 हजार मतदान यंत्रांचा वापर केला जाणार आहे. पुणे मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून डॉ. सुहास दिवसे हे स्वतः काम पाहणार असून मावळ मतदार संघासाठी पुणे महानगर क्षेत्र प्राधिकरणाचे अतिरिक्त आयुक्त दीपक सिंगला यांची तर बारामती मतदार संघासाठी पुणे महसूल विभागाच्या अतिरिक्त आयुक्त कविता द्विवेदी यांची निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. अतिरिक्त जिल्हाधिकारी अजय मोरे यांच्याकडे शिरुर मतदार संघाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. जिल्ह्यात एकंदर 20 मतदान केंद्र संवेदनशील असून 3 हजार 941 मतदान केंद्रांवरील मतदान प्रक्रियेचं थेट प्रक्षेपण केलं जाणार आहे. निवडणुकीसाठीच्या आदर्श आचारसंहितेचं जिल्ह्यात काटेकोरपणे पालन केलं जाणार असून त्या अनुषंगानं विविध उपाय योजना सुरु करण्यात आल्याचं डॉ. दिवसे यांनी सांगितलं.

**आचार संहिता**

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आचारसंहिता भंगाच्या तक्रारीसाठी जिल्हा निवडणूक प्रशासनानं 18002330102 आणि 1950 हे टोल फ्री संपर्क क्रमांक उपलब्ध करुन दिले आहेत. आचारसंहिता भंगाच्या तक्रारी करण्यासाठी नागरिकांनी या क्रमांकांवर संपर्क साधावा, असं जिल्हा प्रशासनानं कळवलं आहे.

**एनआयए**

पुणे ईसीस मोड्यूल प्रकरणी 11 आरोपींशी निगडीत चार मालमत्ता राष्ट्रीय तपास संस्थेनं आज जप्त केल्या. या मालमत्ताचा वापर दहशतवादी कृत्याचं प्रशिक्षण, तसंच स्फोटकं तयार करण्यासाठी केला जात असल्याचं एनआयएनं म्हटल आहे. जप्त केलेल्या मालमत्ता पुण्यातील कोंढवा परिसरात असून या प्रकरणी एनआयएनं 11 जणांवर या आधीच आरोपपत्र दाखल केलं आहे.

**बाजार समिती**

पुणे कृषि उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज महाराष्ट्रासह विविध राज्यातून नव्वद ट्रक फळभाज्यांची आवक झाली. उन्हाचा कडाका आणि पाण्याचे दुर्भिक्ष्य याचा परिणाम शेतमाल उत्पादनावर झाला असून आवक घटल्याने आणि मागणीही फारशी

नसल्याने आज बहुतांश फळभाज्यांचे भाव स्थिर आहेत. पालेभाज्याचे भाव मात्र तेजीत आहेत. उन्हाळी रसाळ फळांना ग्राहकांकडून चांगली मागणी आहे. लिंबाचे भावही प्रति गोणीमागे दहा टक्क्यांपर्यंत वधारले आहेत. फुल बाजारात मंदीचं वातावरण आहे.

**Pcmc**

पिंपरी चिंचवड शहराची वाढती लोकसंख्या आणि त्या अनुषंगाने पाण्याची वाढती मागणी विचारात घेता चिखलीतील 200 एमएलडी जलशुद्धीकरण केंद्राला महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी मान्यता दिली. या प्रकल्पामुळे आगामी काळात चिखली तळवडे, मोशी, चऱ्होली, डूडुळ गाव, दिघी जाधववाडी या भागांचा पाणी प्रश्न सुटणार आहेत. पुढील वर्षापर्यंत हा प्रकल्प पूर्ण होण्याचा अंदाज आहे.

**पुणे जिल्हा परिषद**

पुणे जिल्हयातील समाजमंदिरांचं ग्रंथालय किंवा अभ्यासिकेमध्ये रूपांतर करण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यामध्ये तीनशेपेक्षा जास्त समाजमंदिरांचं ग्रंथालय होणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागानं दिली आहे. वाचनसंस्कृती वाढावी, त्याचबरोबर स्पर्धा परीक्षाची तयारी करण्यासाठी मुलांना उपयुक्त पुस्तके उपलब्ध व्हावीत यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

**हॉकी**

पिंपरी इथ सुरू असलेल्या 14 व्या हॉकी इंडिया वरिष्ठ महिला राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत आज सकाळच्या सत्रात झालेल्या सामन्यात बलाढ्य हरियाणा संघाने पाँडिचेरी संघाचा 22-0 असा धुव्वा उडवला. तर अन्य एक सामन्यात ओडिशा संघाने चंदिगढ हॉकी संघावर 6-2 अशा फरकाने विजय मिळवला.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 36 अंश तर किमान तापमान 15 पूर्णांक 6 दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. उद्याही साधारण असंच तापमान राहील असा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तातं, उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**